# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** सातारा शहर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0693 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/08/2022 23:55 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 02/08/2022
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/08/2022
   **Time From (वेळेपासून):** 14:35 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:35 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/08/2022 **Time (वेळ):** 22:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 071 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/08/2022 23:55 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 3 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा का,कार्यकारी अभियंता मद, जलसंधारण विभाग,सातरा

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** शहाजी उर्फ नंदकुमार नानासो वाघ

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1968 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लोणंद,खंडाळा,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आसले ,वाई,सातारा,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिश पंचप्पा लब्बा | | | 1. 81 सिध्देश्वर पेठ,सोलापुर,सातारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब तारीख 2/8/2022मी ,शहाजी उर्फ नंदकुमार नानासो वाघ वय-54वर्ष , शिक्षण- 12 वी , व्यवसाय- पोट ठेकेदार रा- मुळ गाव मुपो आसले ता वाई जि सातारा सध्या रा- मुपो लोणंद ता खंडाळा जि सातारा मोनं - 9860656032.समक्ष सातारा शहर पोलीस स्टेशनमध्ये हजर होवुन देतो खबरी जबाब की मी वरील ठिकाणी माझे कुंटूबासह राहण्यास आहे. मी केदार डेव्हलपर्स , दहिवडी ता माण जि सातारा प्रो अतुल शिंदे यांचे मार्फत मी पोट टेकेदार म्हणुन काम करतो.मी 2021 पासुन केदार डेव्हलपर्स , दहिवडी यांचे नावावर पोट टेकेदार म्हणुन काम करत असुन त्यांचे नावावर मंजुर करण्यात आलेल्या सिमेंट क्रॉकिट बंधा-याची कामे करतो व त्या कामासंबधी कार्यालयनी व्यवहाराचे कामकाज मी पाहत असतो सिमेंट क्रॉकिट बंधा-याची केलेल्या कामाची बिले मृदा व जससंधारण विभाग सातारा यांचेकडे जमा केल्यानंतर त्यांच्याकडून मी बिले मंजुरीसाठी व अनुदानासाठी कार्यकारी संचालक मृदा व जससंधारण विभाग औरंगाबाद या विभागाकडे पाठविली जातात. त्यानंतर औरंगाबाद विभागाकडे पाठविलेल्या बिलाची त्यांच्याकडे तपासणी होवुन शासकीय कपात होवुन उर्वरीत रक्कम संबंधीत एजन्सीच्या नावे खात्यावर जमा होते. त्यानंतर एजन्सी ही त्यांचे कमिशन व जीएसटी रक्कम कपात करून संबधीत ठेकेदाराचे नावे रक्कम अदा करते अशी कामाची पद्धत आहे दिनांक 25/5/2022 रोजी केदार डेव्हलपर्स , या एजन्सीच्या नावावर असलेले चाहुर भवानी ओढा भुईज ता वाई जि सातारा येथील सिमेंट क्रॉकिट बंधा-याचे काम हे मी घेतले होते.सदरचे काम 29,26,000/- रूपयांचे होते .सदरचे काम मी दिनांक 30/5/2022 रोजी पुर्ण केले होते. त्यानंतर मी दिनांक 6/6/2022 रोजी मी केदार डेव्हलपर्स या एजन्सीचे नावावर असलेले वाखनवाडी ता वाई जि सातारा येथील सिमेंट क्रॉकिट बंधा-याचे काम घेतले सदरचे काम हे 19,62,000/- रूपयांचे होते .सदरचे काम मी दिनांक 17/6/2022 रोजी पुर्ण केले होते. त्यानंतर दोन्ही कामाचे मिळुन झालेले अंदाजे 48,88,000/- रूपयाचे बिल जलसंधारण अधिकारी मृदा व जयसंधारण उपविभाग वाई यांचे मार्फत व बिले अदा करण्यासाठी दिनांक 15/7/2022 रोजी मृदा व जलसंधारण विभाग सातारा या ठिकाणी मी स्वता घेवुन जमा केले होते.त्यानंतर दिनांक 22/7/2022 रोजी मी जमा केलेली बिले मृदा व जलसंधारण विभाग सातारा कार्यालयाकडून मंजुर झाली आहेत का नाही हे पाहण्याकरिता कार्यालयात गेलो असता मला सतीश पंचप्पा लब्बा जिल्हा जलसंधारण अधिकारी सातारा यानी समक्ष बोलावुन मी केलेल्या कामाचे सरकारी वजावट करून अंदाजे 46,00,000/- रूपये बिल मंजुरासाठी वरिष्ठ कार्यालयांचे मान्यतेकरिता सही साठी असल्याचे सांगुन त्यांनी मला माझे बिल मंजुर करून वरिष्ठ कार्यालयासाठी पाठविण्यासाठी मी केलेल्या कामाच्या बिलाच्या रक्कमेच्या 2 टक्के प्रमाणे 92,000/-रूपयांची मागणी केली त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन घरी निघुन गेलो.त्यानंतर मी दिनांक 28/7/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सातारा कार्यालयात येवुन जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मृदा व जलसंधारण विभाग सातारा कार्यालयातील सतिश पंचप्पा लब्बा जिल्हा जलसधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हे लाज मागणी करीत असल्याची लेखी तक्रार पोनि राऊत साहेब यांना दिली.त्यानंतर पोनि राऊत साहेब यांनी माझे तक्रारी प्रमाणे पुढील कारवाई करणेकरिता सातारा नगरपरिषद सातारा

कार्यालयातील 1)प्रशांत बाळकृष्ण गंजीवाले स्वच्छता निरीक्षक 2)विक्रम सुर्यकांत जरंडे कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी असे दोन पंच उपलब्ध करून घेतले त्यानंतर पोनि राऊत यांनी दोन पंचाची व सापळा पथकाची ओळख करून दिली त्यानंतर मी दिलेला लेखी तक्रारी अर्ज पोनि राऊत साहेब व दोन्ही पंचानी वाचुन पाहीला .त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यकारी अभियंता मृदा व जलसंधारण विभाग सातारा कार्यालयातील सतिश पंच्चाप्पा लब्बा जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी माझ्याकडे लात मागणी केली अगर कसे यांचे पडताणी करणेसाठी पंच क्रमांक 1म्हणुन गंजीवाले व पंच क्रमांक 2 म्हणुन जरंडे यांनी काम करण्याचे पोनि राऊत यांनी ठरवुन दोन्ही पंचानी व पोनि राऊत यांनी माझ्या तक्रारी अर्जावर सह्या केल्या.त्यानंतर पोनि राऊत यांनी मला व पंच नं 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डसह माझ्याकडील चार चाकी वाहन मारूती सुझूकी स्विफ्ट डिझायर मधुन लब्बा साहेब यांची भेट घेणेकामी मृदा व जलसंधारण विभाग सातारा येथे पाठवुन पडताळणी केली असता त्यामध्े लब्बा साहेब यांची माझ्याशी समक्ष भेट झाली त्यावेळी मी केलेल्या सिमेंट क्रॉंकिट बंधा-याचे कामाचे बिलाचे मंजुरीबाबत चर्चा होवुन मी केदार डेव्हलपर्स यांचे एजन्सीचा पोट ठेकेदार म्हणुन केल्या सिमेंट क्रॉंकिट बंधा-याचे कामाचे बिलावर सही करून मंजुर वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यासाठी कामाचे एकुण 46,00,000/- रूपये बिलाचे 2टक्के प्रमाणे 92,000/- हजार रूपयांची लाच रक्कमेची मागणी करून मी लाच रक्कम दिनांक 29/7/2022 रोजी मृदा व जलसंधारण कार्यालयात आणुन देण्यास सांगितल्याचे ध्वनी मृद्रीत झालेल्या संभाषणावरून माझा तसेच पंच क्रमांक 1 यांचे हकीगती वरून पोनि राऊत व दोन्ही पंचाची खात्री झालीयत्यानंतर पोनि राभत यांनी दिनांक 29/7/2022 रोजी सापळा कारवाई नियोजन करून मला घरी जाण्यास सांगितले. त्यानंतर लब्बा साहेब हे दिनांक 29/7/2022 रोजी कार्यालयीना कामकाजासाठी पुणे येथे जाणार असल्याचे व दिनांक 2/8/2022रोजी पुन्हा सातारा येथील कार्यालयात येणार असल्याचे समजल्याने मी पोनि राऊत यांना त्याबाबत कळविले त्यावेळी पोनि राऊत यांनी दिनांक 2/8/2022 रोजी सापळा कारवाई नियोजन केले .आज दिनांक 2/8/2022 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो सातारा कार्यालयात येवुन माझा जबाब पोनि राऊत यांना दिला.त्यानंतर पोनि राऊत यांनी माझे दिनांक 28/7/2022 रोजीचे तक्रारी प्रमाणे सातारा नगरपरिषद कार्यालयातील 1)प्रशांत बाळकृष्ण गंजीवाले स्वच्छता निरीक्षक 2)विक्रम सुर्यकांत जरंडे कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी असे दोन पंच उपलब्ध असुन पोनि राऊत यांनी पुन्हा दोन पंचाची व सापळा पथकाची ओळख करून दिली.त्यानंतर मी दिलेला जबाब पोनि राऊत साहेब व दोन्ही पंचानी वाचुन पाहिला त्यानंतर माझा दिनांक 28/7/2022 रोजीचे तक्रारी प्रमाणे जिल्हा जससंधारण अधिकारी तथा कार्याकारी अभिंयता मृदा व जलसंधारण विभाग सातारा कार्यालयातील सतिश पंचाप्पा लब्बा जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्याकारी अभिंयता यांनी माझ्याकडे लाच मागणी केली असुन सापळा कारवाई करणेसाठी पंच 1 म्हणुन गंजीवाले व पंच क्रमांक 2 म्हणुन जरंडे यांनी काम करण्याचे पोनि राऊत यांनी ठरवुन दोन्ही पंचानी व पोनि राऊत यांनी माझ्या जबाबावर सह्या केल्या .त्यानंतर पोनि राऊत यांचे सुचनेनुसार मी 35,000/- रूपये हजर केले व उर्वरीत 57,000/- रूपये डमी खोट्या नोटा पोनि राऊत यांनी हजर केल्या असुन असे एकुण मिळुन 92,000/- लाच रक्कम तयार झाली त्या नोटांचे क्रमांक व वर्णन दोन को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रक्कमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई पोनि राऊत यांचे कक्षात केली सापळा कारवाई संबधाने पोनि राऊत यांनी मला व दोन्ही पंचाना तसेच सापळा पथकास आवशक त्या सुचना दिल्या त्यानंतर माझ्याकड़े व्हाईस रेकॉर्ड देवुन पंच क्रमांक 1यांना माझ्या सोबत माझ्या चारचाकी वाहनातुन जिल्हा संधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मृदा व जलसंधारण विभाग सातारा कार्यालयातील सतशि पंचाप्पा लब्बा जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांची भेट घेणेकामी मृदा व जलसंधारण विभाग सातारा येथे रवाना केले.पोनि राऊत व सापला पथक यांचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन शासकीय वाहनाने आले .मी व पंच क्रमांक 1असे दोघेजण माझे चारचाकी वाहनावरून लंब्बा साहेब यांची मृदा व जलसंधारण विभाग सातारा येथे भेट घेणेकामी रवाना झालो. आमचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन आपण पंच नं 2व सापळा पथक असे शासकीय वाहन इरटीगा मधुन चालक अडागळे यांचेसह रवाना झालात. मी माझे चारचाकी वाहन बॉम्बेरेस्टारॅंट मार्ग कृष्णानगर येथील मृदा व जलसंधारण विभाग सातारा कार्यालयाकडे घेतले आपण देखील आपले कडील शासकीय वाहन माझ्या वाहनाचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन घेतले मी माझ्याकडील चारचाकी वाहन गुण नियंत्रण उपविभाग क्रमांक 2 सातारा कार्यालय असे लिहलेल्या इमारती समोर डांबरी रोडच्या कडेला पार्क केली त्यावेळी आपण ही आपलेकडील शासकीय वाहन माझे वाहनापासुन ताही अंतरावर थांबविले त्यावेळी व मी व पंच क्रमांक 1 असे माझ्या चारचाकी वाहनामधुन उतरून गुन नियंत्रण विभाग क्रमांक 2 सातारा कार्यालयाचे इमारतीच्या समोरील इमारतीत दरवाज्यावर जिल्हा जलसंधारण अधिकारी असे नावाची पाटी अडकविलेल्या दरवाज्यातुन आत समोरील बाजु असलेल्या लब्बा साहेबांच्या केबीनच्या बाहेर गेलो तेथे एक इसम केबीनच्या बाहेर खुर्चीवर बसलेला होता. त्यावेळी मी त्या इसमास जावु असे विचारले त्यावेळी त्या इसमाने नाय कोणतर गेलय ऑफिस मधले ते आले की जावा बसा . असे सांगितले त्यावर मी व पंच नं 1 लब्बा साहेबांचे केबिन बाहेर थांबुन राहिलो. थोड्या वेळानंतर लब्बा साहेबांचे केबिन मधुन दोन इसम बाहेर आलेवर मी त्या इसमांस जावु का असे विचारले.त्यावेळी त्या इसमाने जावा की असे सांगितले. त्यानंतर मी लब्बा साहेबांचे केबिनचा दरवाजा उघडुन साहेब येवु का असे विचारले, त्यावर लब्बा साहेब यांनी हा तुम्हा काय फोन केला तिकडं असे विचारले त्यावेळी मी व पंच नं 1 असे लब्बा साहेबांचे केबिन मध्ये गेलो. तेथे मी लब्बा साहेबांचे टेबला समोरील खुर्चीवर बसलो. व पंच नं 1 हे केबिन मधील बाजुच्या खुर्चीवर बसले.त्यानंतर माझेत व लब्बा साहेब यांचेमध्ये माझे बिलाबाबत औरंगाबादला फंड आहे की नाही व बिल औरंगाबाद ला कोन नेहणार याबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी एकतर पवार साहेबांचे कोणीतरी ओळखीचे असल किंवा तुमच लब्बा साहेबांना दोघांपैकी एकजनाला सांगुण फोन करून मग जावु असे म्हणले असा झाला होता विषय. आणि मगाशी चिकने बाईचा फोन आला होता, बिल तुम्ही घेवुन जाता का ऑफिस ने पाठवायचे आहे,असे म्हणालो त्यावर लब्बा साहेब हे हम्म असे म्हणाले त्यावर आम्ही कोळेकर राव साहेबांना घेवुन जातो उद्या परवा दोन दिवसात हम्म असे म्हणालो .त्यानंतर मी व लब्बा साहेब यांचेमध्ये माझे कामा बाबत चर्चा झाली. दरम्यान लब्बा साहेब यांनी औरंगाबाद ऑफिसला असणारे निकम साहेब यांचा फोन नंबर घेवुन त्यांचे मोबाईल वर फोन करून माझे कामा बाबत चर्चा केली.त्यानंतर लब्बा साहेब यांनी त्याचा डाव्या हाताचा अंगठा तर्जनी वर घासुन लाच मागणीचा सुचक इशारा करत नाय नाय आज उद्या दोन दिवसात संपवायच असे म्हणाले. त्यावर मी माझे पन्टचे उजवे खिश्यात ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने काढुन लब्बा साहेब यांचे समोर धरून तेव्हा आपलं 46 लाखाचं ठरल्या प्रमाणे 92 हजार हायत असे म्हणालो. त्यावेळी लब्बा साहेब यांनी माझे हातातील लाच रक्कम उजवे हाताने स्विकारून लाच रक्कमेवर नजर फिरवुन त्यांचे समोरील टेबल वरील उजवे बाजुचे पहिल्या ड्रावहरमध्ये ठेवत हम्म तुम्ही काय करा असे म्हणाले. त्यानंतर मी व लब्बा साहेब यांचेमध्ये माझे कामा बाबत चर्चा झाली.त्यावेळी लब्बा साहेब यांनी मला औरंगाबाद चे निकम रावसाहेब यांचा मोबाईल नंबर दिला.त्यानंतर मी ओके चलु साहेब असे म्हणालो.त्यावर लब्बा साहेब हा ओके असे म्हणाले त्यानंतर मी व पंच नं 1 लब्बा साहेबांचे केबिन मधुन बाहेर आलो त्यावेळी पंच नं 1 लब्बा साहेबांचे केबिन चे बाहेर थांबुन राहिले.व मी कार्यालयातुन बाहेर येवुन माझा डावा हात डोक्यावरून दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. तो इशारा पाहुण पो नि राऊत पंच नं 2 व सापळा पथक माझ्या जवळ आले.त्यानंतर पो नि राऊत साहेबांनी माझेकडील व्हईस रेकर्डर काढुन घेवुन बंद केला.व मला बाजुला थांबण्यास सांगितले त्यानंतर पो नि राऊत साहेब व पथक असे पंच नं 1 यांचेकडे गेले त्यानंतर पो नि राऊत यांनी जिल्हा संधारण अधिक अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मृद व जलसंधारण विभाग सातारा कार्यालयात पथकाचे सहाय्याने सतिश पंचप्पा लब्बा जिल्हा जलसंधारण अधिकारी व कार्यकारी अभियंता ,मृद व जलसंधारण विभाग सातारा कार्यालयात तपासण्या केल्या . त्यानंतर मला पोनि

राऊत यांनी कार्यालयात बोलावुन माझी देखील अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझे उजवे हाताचे बोटांचे पेन्यास व तळहातास व तसेच माझे पॅन्टच्या उजवे बाजुचे खिश्याचे आतील बाजुस व कंडास आतील अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे जावुन थांबण्याची सुचना दिली.त्यानंतर मी माझेकडील चारचाकी वाहणाने लाचलुचपत प्रतिबधक विभाग सातारा कार्यालयात येवुन थांबुन राहिलो. काही वेळाने पो नि राऊत हे सतिश पंचप्पा लब्बा , जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना सोबत घेवुन पथकासह लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय सातारा येथे दाखल झाले त्या ठिकाणी पो नि राऊत यांनी मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले त्यानंतर थोड्या वेळाने मला कार्यालयात घेवुन दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पो नि राऊत यांनी माझी व पंच नं 1 यांचे सांगणे प्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोउल्लेख केला.त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबणेस सांगितले.त्यानंतर काहि वेळाने पुन्हा मला कार्यालयामध्ये बोलावुन घेवुन मला हकिकत विचारली, ती मी वरील प्रमाणे सागिंतली सदर बाबत सविस्तर यशस्वी पंचनामा लाच लुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे टंकलिखीत करणेत आला आहे.

तरी कारवाई मध्ये लोकसेवक सतिश पंचप्पा लब्बा वय 48 वर्षे जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता वर्ग 1 जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता वर्ग 1 ,जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मृद व जलसंधारण विभाग सातारा सध्या रा.मोहर बंगला, सावंत कॉलणी ,शाहुनगर गोडोली सातारा मुळ रा. 81 सिध्देश्वर पेठ सोलापुर ता जि.सोलापुर यांनी दि. 28/7/2022 रोजी पडताळणी कारवाई मध्ये मी केदार डेव्हलपर्स यांचे एजन्सी चा पोट ठेकेदार म्हणुन केलेल्या सिमेंट कॉक्रेट बंधाऱ्याचे कामाचे बिलावर सही करून मंजुर करून वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्या करीता कामाचे एकुण 46,00,000 रूपये बिलाचे 2 टक्के प्रमाणे 92,000 रूपये लाच रक्कमेची मागणी करून दिनांक 2/8/2022 रोजी 14/35 वा चे सुमारास सापळा करावाई वेळी ,जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मृद व जलसंधारण विभाग सातारा येथे माझे बिलाचे 2 टक्के प्रमाणे 92,000 रूपयाची लाच रक्कम मृद व जलसंधारण विभाग सातारा येथिल कार्यालयात स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरूध्द तक्रार आहे.

समक्ष

हा खबरी जबाब दिला.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम/ हाती घेतले):** BAGHWAN BABANRAO NIMBALKAR(I (Inspector)) **or** (किंवा) DGPBBNH6502

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** BAGHWAN BABANRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPBBNH6502

पो. स्टे. ऑफिसर
सातारा शहर पो. स्टे